# Harappa Culture

Dr. Giridhar Somwanshi
M.A. ,M.Ed., SET.,Ph.D.(History)
Assistant Professor in History, Shri Chhatrapati Shivaji Mahavidyalaya,Omerga.
(Affiliated to Dr.BAMU,Aurangabad)

# हडप्पा संस्कृती

प्रस्तावना□

हडप्पा संस्कृती ही जगातील प्राचीन पैकी एक संस्कृती आहे .हडप्पा संस्कृतीला सिंधू संस्कृती□नागरी संस्कृती□व्यापारी संस्कृती□कास्ययुगीन संस्कृती या नावानी ओळखली जाते . १९२२ मध्ये हडप्पा येथे श्री राखलदास बॅनर्जी यांनी व मोहोंजदारो येथे श्री दयाराम सहानी यांनी या संस्कृतीचा शोध लावला .या संस्कृतीचा विस्तार उत्तरेस जम्मू□दक्षिणेस नर्मदा नदी□पश्चिमेस बलुचिस्तानच्या मकरात तट व पूर्वेस मेरट पर्यत असुन १□२□९९□६०० वर्ग किलोमीटर एवढा व्यापला असुन १५०० पेक्षा जास्त स्थेळे सापडली आहेत . इ .स .पू .३१०० ते इ .स .पू .स१५०० हा या संस्कृतीचा कालखंड मानला जातो .

# हडप्पा संस्कृतीची महत्त्वाची केंद्रे

पंजाबमध्ये
हडप्पा□रूपड□
मंडा

गुजरातमध्ये लोथल□
धोलाविरा□
बालाकोट□देसलपुर□
रोजडी□रंगपूर
सुरकोटडा

राजस्थानमध्ये
कुल्ली□
कालीबंगन

सिंधमध्ये
मोहोंजदाडो□
चन्दुहडो□आमरी□
आणि हरियाणात
बनवाडी

मध्यभारतात
महेश्वर□
आलमगीरपूर

महाराष्ट्रात
दायमाबाद

**१. हडप्पा** □ पंजाबमधील रावी नदीच्या डाव्या किनारी मातीच्या दोन टेकडयाखाली दयाराम साहनी व माधव स्वरूप वत्स यांनी १९२२ मध्ये व्यापक उत्खनन करून या नगराचा शोध लावला. शहराभोवती भक्कम तटबंदी असून आतील भागात मोठा चौथरा आहे. त्यावर भाजीव विटांनी इमारती बांधल्या आहेत. कामगारांसाठी एकसारखी घरे प्रशस्त अंगण व धान्यासाठी कोठारे बांधली आहेत. कामगारांच्या घराशेजारी शेणी व कोळसा यांची राख असलेल्या १६ भट्टया विटा भाजण्यासाठी तयार केलेल्या आहेत. धान्य कोठारे दोन रांगात बांधली असून दोहोंच्यामधून ७ मीटर रूंदीचा मार्ग ठेवला आहे. शहराच्या दक्षिणेस कबरस्थान आहे. पक्क्या विटांनी बांधलेल्या एक हौद व पाणी वाहून जाण्यासाठी आच्छादित गटार आहे.

**२.मोहेंजोदडो**□

सिंध प्रांतातील लारकाना शहराशेजारी हडप्पाप्रमाणेच दोन मातीच्या प्रचंड टेकडयाखाली मोहेंजोदडो हे मोठे नगर सापडले. या टेकडयांची खुदाई राखालदास बॅनर्जी मार्शल मॅकाय व्हीलर जी एफ डेल्स यांनी करून या नगराची सात थरामध्ये असलेली वस्ती निदर्शनास आणली. या शहरातील वैशिष्टयपूर्ण वास्तू म्हणजे सार्वजनिक महास्नानगृह होय.या शहराचा दुसरा भाग विनातटबंदी असला तरी त्याची उभारणी अत्यंत रेखीव व नियोजनपूर्ण आहे. दक्षिणोत्तर व पूर्व पश्चिम रस्त्यांची आखणी केलेली असून शहराची विभागणी समान क्षेत्रफळात केल्याचे दिसते. प्रमुख रस्त्याची रूंदी ९.१४ मीटर व गल्ल्यांची रूंदी ३ मीटर असून घरांचे प्रवेशद्वार मुख्य रस्त्यांकडे नसून अरूंद गल्ल्यांकडे आहे. घरे फारसी सजविलेली नसली तरी हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या ठेवलेल्या आहेत. पाणी पुरवठयाची सोय चांगली आहे.

स्नान व स्वच्छता गृह वगैरेचे सांडपाणी जाण्यासाठी विटांनी सुव्यवस्थित बांधलेली गटारे आहेत.

दगड तांबे कास्य व मातीपासून बनविलेल्या मूर्ती आणि अन्य वस्तू पाहिल्यास या शहरातील लोकांची उच्च सौंदर्यदृष्टी दिसून येते. मातीच्या व कास्याच्या भांडयावरील प्राण्यांची वृक्षांची व देवतांची रंगवलेली चित्रे पाहिल्यास तेथील लोक मातृदेवता व शिव पशुपती यांची पूजा करीत असावेत.

सिंधू संस्कृतीच्या वैशिष्टयांमध्ये एका दगडी मुद्रेवर कोरलेले जहाज मातीवर जहाजाचे उठाव चित्र तांबे आणि कास्याची हत्यारे व भांडी चुनखडीचे दाढीधारी मानवाच्या शिराचे शिल्प हत्तीची सोंड व बोकडाची शिंगे असलेल्या बैलाचे चित्र हत्ती व वाघाच्या आकाराच्या मुद्रा दगडी लिंग स्त्रीचे मातीचे उठाव शिल्प दोरा ओवण्यासाठी छिद्र असलेले माकडाचे शिल्प बालकाला स्तनपान देत असलेल्या मातेचे धातूचे शिल्प मानवी मुखाचा वाघ दाढीधारी मानवी मुखाचा कुत्रा आणि कोल्हा इ.वस्तूंचा समावेश आहे.

## ३.लोथल

गुजरातमधील अहमदाबाद जिल्ह्यातील खंबायतच्या आखाताला जोडणारे लोथल हे जगातील प्राचीन बंदर होते. या शहराची व बंदराची उभारणी नियोजनपूर्वक व रेखीवपणे केल्याचे दिसते. या बंदरातील २३० मीटर लांब व ४० मीटर रूंद आकाराची व सुमारे ४ मीटर उंच भिंत असलेली गोदी पक्क्या विटांनी बांधलेली असून तिचा उपयोग व्यापार व जहाज बांधणीसाठी दुरूस्तीसाठी केला जात असावा.भरतीच्या वेळी समुद्रातील पाणी आत घेण्यासाठी एक नाल आणि जादा पाण्यासाठी दुसरी नाल

बांधून गोदी एखाद्या तलावाप्रमाणे तयार केली आहे. भरती ओहोटीच्यावेळी पाणी बाहेर जाऊ नये. अशी व्यवस्था या गोदीत केली होती. येथील उत्खननात तांदूळ अवशेष सापडले आहेत. स्त्री पुरूष एकत्र असलेले दोन सांगाडे उत्खननात सापडलेले आहेत. या वरून सतीची चाल अस्तित्वात असावी असे दिसते.

## ४ . ढोलविरा

२० व्या शतकाच्या अखेरीस गुजरातमधील कच्छ जिल्ह्यात ढोलविरा येथे उत्खनन झाले. यामुळे सिंधू संस्कृतीच्या ग्रामीण भागावर विशेष प्रकाश पडला आहे. परंतु या गावांना कसलेच नियोजन नव्हते. ढोलविरा गावाचे तीन स्थरात उत्खनन करण्यात आले. वरच्या थरात मौल्यवान खदे दागिने बांगडया धातूच्या मुर्ती सुरी या वस्तू सापडल्या मधल्या थरात तांब्याचा गळ दुर्मिळ मऊ पांढरा दगडा पासून बनविलेली नाणी व अन्य वस्तूपासून बनविलेली नाणी व अन्य वस्तू सापडल्या. तिसरा स्थर उत्खनन करताना रांजण मातीची ओबडधोबड भांडी मिळाली. एका उत्तम माठावर शृंग व केशसंभारयुक्त पशुपतीची मूर्ती रेखाटली आहे. एक पुरूषाचा पुतळा व विवस्त्र नर्तकीची मूर्ती मिळाली आहे. हडप्पा संस्कृतीतील पशुपती पूजन यज्ञकुंडे पशूंच्या अस्मरूपी अस्थी या ठिकाणी मिळाल्या आहेत. गहु बार्ली तेलबिया कडधान्ये यांचे अवशेषावरून येथील लोकांना शेतीकला अवगत असल्याचे दर्शवितात. शिकार व मांसाहार हे उदरनिर्वाहचे साधन असावे.

## ५ . कालीबंगन

हे सरस्वती नदीच्या तीरावर वसलेले आहे. येथील लोक तटबंदीयुक्त गावात रहात असत. पूर्व हडप्पाकाळात येथील घरे कच्च्या विटांनी बनविलेली होती. विटा विशिष्ट प्रमाणात असत. येथील लोकांना शेतीचे ज्ञान होते. ते विकसित स्वरूपाची शेती करीत असत.हे शहर बालेकिल्ला व लोकवस्तीचा भाग या दोन भागात वसलेले असून दोन्ही भागास प्रत्येकी स्वतंत्र अशी मातीची तटबंदी आहे. बालेकिल्ल्याच्या दक्षिणेस कामगारांची वस्ती व शेतीचा भाग दिसून येतो.बालेकिल्ल्याचे उत्तर व दक्षिण असे दोन समान भाग केले आहेत. दक्षिण भागात धार्मिक स्थळे तर उत्तर भागात रस्त्याच्या दोन्ही बाजूस घरांची रांग दिसून येते. या ठिकाणी हडप्पा संस्कृतीच्या उदयाची प्राथमिक अवस्था दिसून येते. ते बालेकिल्ल्याच्या भागात तटबंदीच्या आत असून शेतीतून आंतरपिके घेत. पूर किंवा भूकंपामुळे हे शहर ओसाड झाले. येथील समाजात त्रिस्तरीय सामाजिक भेद दिसून येतात. बालेकिल्ल्यात पुरोहित वर्ग लोकवस्तीच्या भागात राहणारा शेती उद्योग कारणारावर्ग व कष्टकरी कनिष्ठ वर्ग.विकसित हडप्पा काळामध्ये येथील बालेकिल्ल्याच्या दक्षिण भागात मातीच्या विटांनी बांधलेले उंच जोते दिसून येतात. प्रत्येक जोत्यामध्ये मोकळी जागा ठेवलेली आहे. यातील एका जोत्यावर सात अग्नीवेदी बांधलेल्या आहेत. जवळच एक विहीर व आंघोळीसाठी उंचवटे केलेले आहेत.

या दक्षिण भागास दोन दरवाजे असून दरवाज्यातून दक्षिण भागात जावयाचे असल्यास पाय उतार होऊन जावे लागते .

लोकवस्तीचा भाग तटबंदीने बंदिस्त असून त्यास पश्चिमेस बालेकिल्ल्याकडे जाण्यासाठी व वायव्येकडे नदीकडे जाण्यासाठी असे दोन दरवाजे आहेत . येथील घरे मातीच्या विटांची असून येथे सांडपाणी वाहून जाण्यासाठी उत्तम व्यवस्था असून गटारे विटांनी बांधलेली आहेत . येथील रस्ते उत्तर दक्षिण हेव पूर्व पश्चिम जाणारे असून यास गल्ल्यातील रस्ते जोडलेले आहेत . येथील घरे ही एक अंगण व त्या भोवती बांधलेल्या खोल्या असा रचनेची आहेत . घरांची जमिन मातीच्या विटांनी बनविलीअसून काही ठिकाणी फरश्या बसविलेल्या आहेत . गुरांना चारा खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अंगणात मातीच्या विटांचे एक मोठे भांडे व जमिनीत एक मडके पुरलेले आहे .

# हडप्पा संस्कृतीची नगररचना

रस्ते□एकमेकांना काटकोनात छेदनारी ९ ते ३३ फुट रूंद

घरे□दोन ते तीन मजली□दरवाजा व खिडक्या मुख्य रस्त्यांकडे नाहीत .

महास्नानगृह□सार्वजनिक महास्नानगृह सापडलेत ज्यांचा विस्तार १८०□१०८आहे .

सांडपाण्याची व्यवस्था□सांडपाणी रस्त्याच्या दोन्ही बाजुच्या गटारातुन मुख्य गटारास जावुन मिळे .

सार्वजनिक इमारती□२४२ फुट लांब व ११२ फुट रूंद एक इमारत  सापडली .

पाण्याच्या विहिरी□अनेक ठीकाणी खाजगी व सार्वजनिक विहरी सापडलेत .

तटबंदी□या संस्कृतीतील अनेक स्थळांना तटबंदी व खंदक आहेत .

धान्याची कोठागरे □अनेक ठीकाणी खाजगी व सार्वजनिक धान्य कोठारे सापडलेत .

चुना व विटांचा वापर□ बांधकासाठी चुना व  कच्च्या आणि पक्क्या विटांचा वापर केला .

# हडप्पा संस्कृतीतील रस्ते



# हडप्पा संस्कृतीतील घरे



# सिंधू संस्कृतीत सापडलेले महास्नानगृह



# सांडपाण्याची व्यवस्था



# सार्वजनिक धान्याची कोठारे



# हडप्पा संस्कृतीतील व्यापारी केंद्र लोथल



# हडप्पा संस्कृती अस्ताची कारणे

- नद्यांना महापूर
- अवर्षण
- भूकंप
- निर्सग नियम
- आर्याचे आक्रमण
- व्यापारातील घट


THANK
YOU!